सुक्ष्म, लघु व मध्यम अन्न प्रक्रिया उद्योगांबाबत क्षेत्रफळाबाबतचे निकष निश्चित करण्याबाबत..

# महाराष्ट्र शासन

**कृषि,पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

**शासन निर्णय क्र. कृराधो-१४१७/प्र.क्र.१०९/९-अे**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२.

**दिनांक : ०६ जून, २०१८**

**वाचा:-**

१) सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योग विकास अधिनियम( MSMED ACT )२००६.NO.२७ OF २००६ दिनांक-१६जून २००६

२) शासन निर्णय -कृषि पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग क्र.राअअ-१११६/प्रक्र.२४८/१४ अे, दिनांक २० जून, २०१७

३) शासन निर्णय -कृषि पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग क्र -कृप्रधो-२०१७/प्रक्र.२०८/९अे दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१७

४) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम दि.१७/०१/२०१८

**प्रस्तावना :-**

सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांची (MSMEDS )ची परिभाषा संदर्भाधीन क्र.१ च्या सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योग विकास अधिनियम( MSMED ACT )२००६ मध्ये अंतर्भूत आहे. सदर अधिसूचनेतील प्रकरण ३, ७ (a) १ नुसार सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांच्या व्याख्या खालीलप्रमाणे आहेत .

| अ.क्र. | उद्योगाचे स्वरूप | विकास उद्योग | सेवा उद्योग |
|---|---|---|---|
| १. | सुक्ष्म | ज्यामध्ये रू. २५ लाख पेक्षा जास्त गुंतवणुक नाही, असा उद्योग | ज्यामध्ये रू. १० लाख पेक्षा जास्त गुंतवणुक नाही, |
| २. | लघु | ज्यात रू. २५ लाख ते ५ कोटीपेक्षा जास्त गुंतवणुक मर्यादा नाही | ज्यात रू.१० लाख ते २ कोटीपेक्षा जास्त गुंतवणुक मर्यादा नाही |
| ३ | मध्यम | ज्यात रू. ५ कोटी ते १० कोटी रू. पर्यंत गुंतवणुक आहे. | ज्यात रू. २ कोटी ते ५ कोटी रू. पर्यंत गुंतवणुक आहे. |

उद्योगांच्या भांडवली गुंतवणूकीवर आधारीत निकष हे सदर अधिसूचनेनुसारच राहणार आहेत.

राज्याचे अन्न प्रक्रिया धोरण संदर्भाधीन क्र.३ च्या शासन निर्णयान्वये जाहीर केलेले आहे. त्यांतर्गत सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना जमिनीसाठी बिगरशेती परवानगी घेण्याची आवश्यकता नाही. त्यानुसार महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ४२ (२)क मध्ये सुधारणा करुन कोणत्याही सूक्ष्म, लघु व मध्यम अन्न प्रक्रिया औद्योगिक घटकांच्या वापरात अकृषिक परवानगीची अट शिथिल करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे लघु वाणिज्यिक प्रयोजनाकरिता किंवा कोणत्याही सूक्ष्म, लघु आणि मध्यम अन्न प्रक्रिया आद्योगिक घटकांकरिता केला जाणारा जमिनीचा वापर हा शेतीच्या प्रयोजनासाठी केला जाणारा वापर असल्याचे मानण्यात येईल, अशी सुधारणा अंतर्भूत करण्यात आली आहे.

राज्याच्या अन्न प्रक्रिया धोरणाच्या अनुषंगाने व महसूल विभागाने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता-१९६६ मधील कलम ४२ मध्ये केलेल्या उक्त बदलाच्या अनुषंगाने अन्न प्रक्रिया उद्योगांसाठी जमिनीच्या क्षेत्रफळ मर्यादेचे निकष निश्चित करण्याबाबतचा प्रस्ताव कृषि विभागाने महसूल विभागास सादर केला असता, महसूल विभागाने सदर क्षेत्रफळ मर्यादेचे निकष कृषि विभागानेच निश्चित करावेत असे सूचित केलेले आहे. त्यानुषंगाने सूक्ष्म, लघु व मध्यम अन्न प्रक्रिया उद्योगाकरिता क्षेत्रफळ मर्यादा निकष निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याबाबत शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :-**

१. राज्याच्या अन्न प्रक्रिया धोरणानुसार सुक्ष्म, लघु व मध्यम अन्न प्रक्रिया उद्योगांकरिता २० हेक्टर क्षेत्रमर्यादेपर्यंत जमिनीच्या बिगरशेती वापरासाठी शासनाची परवानगी घेण्याची आवश्यकता राहणार नाही. सुक्ष्म, लघु व मध्यम अन्न प्रक्रिया उद्योगांकरिता खालीलप्रमाणे जमिनीची क्षेत्रमर्यादा विहित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कृषि अन्न प्रक्रिया उद्योग | जमिनीचे क्षेत्रफळ निकष |
|---|---|---|
| १ | सुक्ष्म | ५ हेक्टर क्षेत्र मर्यादेपर्यंत |
| २ | लघु | ५ ते१० हेक्टर क्षेत्र मर्यादा |
| ३ | मध्यम | १० ते २० हेक्टर क्षेत्र मर्यादा |

२. सुक्ष्म, लघु व मध्यम अन्न प्रक्रिया उद्योगांकरिता २० हे. क्षेत्र मर्यादेपर्यंत शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय जमीनीचा बिगर शेती वापर पुढील अटींच्या अधीन राहून राहील.

(अ) सदर जमीनीवर अनुज्ञेय असणाऱ्या एकूण एफएसआयपैकी ७५ % एफएसआय औद्योगिक प्रकल्पाच्या तांत्रिक सुविधांसाठी वापरात आणणे बंधनकारक राहील. तसेच तांत्रिक सुविधांमध्ये प्रामुख्याने प्लांट व मशिनरीसह औद्योगिक युनिटची उभारणी करणे, इटीपी प्लांट, पाणी पुरवठा, ड्रेनेज व्यवस्था, पॉवर बँक रुम, गोडाऊन, कोल्ड स्टोरेज इत्यादी औद्योगिक वापरासाठीच्या सुविधांचा त्यामध्ये समावेश राहील.

(ब) जमीनीवरील उपलब्ध एफ.एस.आय.पैकी औद्योगिक वापरासाठीच्या तांत्रिक सुविधांच्या उभारणीसाठी वापरण्यात येणाऱ्या एफ.एस.आय. च्या एक तृतियांश (१/३) एफ.एस.आय. पुरक सुविधांसाठी वापरण्यास अनुमती राहील. अशाप्रकारे अन्न प्रक्रिया उद्योगाकरिता वापरात आणावयाच्या जमिनीवर अनुज्ञेय असलेल्या एफ.एस.आय. पैकी केवळ २५ % एफ.एस.आय. बिगर औद्योगिक कामासाठी उपयोगात आणाता येईल. पुरक सुविधांमध्ये सदर औद्योगिक युनिटकरिता कार्यालयीन कामकाजासाठी इमारत, निवास व्यवस्था, सुरक्षा व्यवस्था, विश्रामगृह, सभागृह इत्यादी बिगर औद्योगिक कामासाठी लागणारे स्थापत्य बांधकाम या बाबींचा समावेश राहील.

३. संबंधीत अन्न प्रक्रिया उद्योजकाने जमिनीचा बिगर शेती वापर करताना मान्यताप्राप्त / सनदी वास्तुरचनाकाराकडून जमीन वापराचा नियोजन आराखडा तयार करुन घ्यावा. तसेच, अन्न प्रक्रिया उद्योगाकरिता सदर जमिनीचा बिगर शेती कामासाठी वापर करत असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यास अवगत करावे. सदर प्रकरणी उद्योजकास सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्व मान्यतेची आवश्यकता असणार नाही.

४. उद्योजकाने शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय जमिनीचा बिगर शेती वापर केवळ "अन्न प्रक्रिया उद्योग" उभारण्यासाठी करणे बंधनकारक राहील व महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ च्या कलम ४२ मधील पोट कलम (२) मध्ये सुधारणा केल्यानुसार, कोणत्याही लघु, सूच्म आणि मध्यम अन्न प्रक्रिया औद्योगिक घटकांसाठी केला जाणारा वापर हा, शेतीच्या प्रयोजनासाठी केला जाणारा जमिनीचा वापर असल्याचे मानण्यात आले असल्यामुळे सदर उद्योगाव्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रयोजनासाठी सदर जमिनीचा वापर करता येणार नाही. त्याचप्रमाणे भविष्यात सदर जमीनचा अन्न प्रक्रिया उद्योगाऐवजी अन्य बिगर शेती कामाच्या प्रयोजनासाठी वापर करावयाचा झाल्यास त्याकरिता रीतसर शासनाची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक राहील.

५. सदर सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योग विकास अधिनियम( MSMED ACT )२००६, दि.१६/०६/२००६ मधील तरतुदीनुसार सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगाची परिभाषा भांडवली गुंतवणूकीच्या आधारे निश्चित केली असून ती परिभाषा अन्न प्रक्रिया

उद्योगांच्या वर्गीकरणासाठीही लागू राहील. तथापि, सदर कायद्यात वेळोवेळी होणाऱ्या बदलानंतर सदर निकष आपोआप अधिक्रमित होतील व कायद्यातील सुधारणांनुसार ते अन्न प्रक्रिया उद्योगांना लागू राहतील.

६. सदर शासन निर्णय महसूल विभागाने त्यांच्या अनौ.सं.क्र. १८३७, दिनांक ०९/०५/२०१८ अन्वये सुक्ष्म, लघु व मध्यम अन्न प्रक्रिया उद्योगांकरिता क्षेत्रफळाचे निकष निश्चित करण्याबाबत कृषि विभागास दिलेल्या निदेशानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०६०६१७३१३९०५०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Shrikant Chandrakant Andge

Digitally signed by Shrikant Chandrakant Andge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5d5ab93b4e4f2fcd87e12fe19b8965025d482b1bee0fffaa62085c34db6bfd8c, serialNumber=d8d9626c9e038380cd235c048f20d7ce74cffd3a95f2ac3c192e9c991f358271, cn=Shrikant Chandrakant Andge
Date: 2018.06.06 17:53:36 +05'30'

**(श्रीकांत आंडगे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन,**

**प्रति,**

१) मा. मंत्री (कृषी) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई -३२
२) मा.राज्यमंत्री (कृषी) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई -३२
३) मा.अपर मुख्य सचिव, (कृषि) यांचे स्वीय सहाय्यक,मंत्रालय, मुंबई -३२
४) आयुक्त कृषी, महाराष्ट्र राज्य,पुणे.
५) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, पुणे
६) सर्व संचालक कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे,
७) सर्व विभागीय कृषी सहसंचालक,
८) सर्व जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी,
९) सहाय्यक संचालक (लेखा) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१०) महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता ) (लेखा परीक्षा ) मुंबई /नागपूर,
११) संचालक लेखा व कोषागार अधिकारी, मुंबई ( २ प्रती)
१२) सहसंचालक लेखा व कोषागारे संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, ५वा मजला, मुंबई -३२
१३) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१४) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
१५) निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई
१६) लेखाधिकारी, महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, पुणे
१७) माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२.
१८) राकृवियो कक्ष,कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१९) निवड नस्ती/९-अे